महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती.
E-mail- divsecamt@rediffmail. com Ph.No. 07212662647

पत्र क्र. अविमं/लेखा/६५१
अमरावती-४४४६०२
दिनांक -२४/०६/२०२५

# परीपत्रक

**विषयः- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत.**

**संदर्भः-** १) राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं./लेखा-प्रकाशन १९३७, दि.०२/०६/२०२५.
२) या कार्यालयाचे पत्र क्र.अविमं/लेखा/४६७,दि.०५/०६/२०२५.
३) राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं./लेखा-प्रकाशन/२२२८, दि.१९/०६/२०२५.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्र क्र.३ अन्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून राज्यातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाकडून नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क राज्य मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याची सुविधा विकसित करण्यात आली आहे.

तरी सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांना कळविण्यात येते की, नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क राज्य मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने दिनांक २३/०६/२०२५ पासून स्विकारण्यात येत आहे. तरी सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क सदर संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीनेच भरणा करण्यात यावे.

तसेच या विभागीय मंडळाकडून ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी बँक ऑफ इंडिया या बँकेचे चालान घेवून गेले असेल आणि चालान फॉर्म शिल्लक राहिले असेल त्या चालानवरून शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंदणी शुल्क, शिक्षण संक्रमण शुल्क वा इतर रकमांचा भरणा करण्यात येणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(निलीमा टाके)
**विभागीय सचिव**
**अमरावती विभागीय मंडळ, अमरावती**

प्रति,
१.प्राचार्य/मुख्याध्यापक
सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
अमरावती विभाग, अमरावती.
२. लेखा शाखा/ रोखपाल
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती

प्रत :- मा. सचिव, राज्य मंडळ पुणे यांना माहितीस्तव.